# महाराष्ट्र शासन वनविभाग

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई - ४०० ०६६ येथील**
**उद्यानांतील वन्यप्राण्यांना म्हशीचे ताजे बीफ पुरवठयाबाबत अटी व शर्ती**
**कालावधी १/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८**

## म्हशीचे बीफ पुरवठयाबाबतच्या अटी व शर्ती .

१) निविदाकार हा बीफ पुरवठा व्यवसायाशी संबंधित असणे जरुरी आहे. त्यास किमान मागील १ वर्षाचा बीफ पुरवठयाचा अनुभव असणे जरुरी आहे. त्या संदर्भातील त्यांना बीफ पुरवठा करण्यांत आलेल्या यंत्रणेचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करावे. त्यात दर व पुरवठा केलेला कालावधी व प्रमाणात/परिमाण नमूद करणे.

२) उद्यानातील वन्यप्राण्यांना पुरविणेत येणारे बीफ हे म्हशीचे ताजे व त्याच दिवशी कापलेले रक्ताचा अंश असलेले (स्पेशलकटस्) मागील पायांचा मासंल भाग, पाठीवरील मांस (हाडांचा भाग नसलेले) किडणी लिव्हर इत्यादी सर्व आवश्यक भागाचे मिश्रण असलेले हाडाचे प्रमाण कमी असलेले देवनार/ठाणे/भिंवडी/कल्याण पशुवधगृह येथील पशुवैद्यकीय तंज्ञानी प्रमाणित केलेले व कापलेल्या बीफ कटसवर संबंधित पशुवधगृह यांची मोहर असलेले उच्च दर्जाच बीफचा पुरवठा करावा लागेल.

३) वर नमुद कत्तल खान्यातून प्रमाणित करण्यांत आलेल्या बीफचाच पुरवठा स्वत:चे खर्चाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्राण्यांच्या पिंजऱ्यापर्यंत सायंकाळी **३.३. ते ४.३०** या वेळेत पोहोच करावा लागेल. फक्त मंडीच्या दिवशी किंवा अपवादात्मक परिस्थितीत बीफचा पुरवठा **सायंकाळी ५.३०** वाजेपर्यंन्त स्विकारणेत येईल. योग्य कारणाशिवाय बीफ पुरवठा ठरलेल्या वेळेत पोहोचला नाही, तर विलंबाबाबत प्रतिदिन **रु. १०००/-** दंड आकाराला जाईल व या विभागांतील मजुरांना द्यावी लागणारी जादा मजुरीची रक्कम मक्तेदाराने मजुरांना त्याच वेळी देण्यात यावी, अन्यथा सदरची रक्कम मांस पुरवठयाचे देय बीलांतून कापून घेतली जाईल.

४) काही अपरिहार्य कारणास्तव संबंधित कत्तलखाना बंद असल्यास व बीफ पुरवठा उपलब्ध न झाल्यास त्याच दराने स्थानिक बाजारातून बीफ/मटण/पोर्क/चिकन पुरवठा करावा लागेल. तसे न केल्यास या विभागामार्फत स्थानिक बाजारातून प्रचलित दराप्रमाणे वरीलप्रमाणे खाद्य खरेदी करण्यात येईल व खरेदी करण्यात आलेल्या फरकाची रक्कम आपल्या मुळ देयकातून वसूल करण्यात येईल. बीफ चिकन, मटण पुरवठा करणे ज्या दिवशी शक्य नसेल त्या दिवसाच्या अगोदर १ दिवस प्रशासनाला कळविणे आवश्यक आहे. तरच प्रशासनाला पर्यायी व्यवस्था करता येईल तसे न केल्यास ठेकेदारांना **प्रति दिन १०००/- रु.** दंडकरणेत येईल. दंडाची रक्कम त्यांच्या बिलातून वसूल करण्यात येईल.

५) पुरविण्यात येणाऱ्या बीफचे परिमाण हे मागणी केलेल्या प्रमाणाच्या ५ टक्के कमी/जास्त प्रमाणात स्विकारले जाईल. कोणत्याही परिस्थितीत निश्चित केलेल्या परिमाणापेक्षा ५ टक्के कमी अथवा जास्त पुरवठा स्विकारला जाणार नाही, निश्चित करण्यात आलेल्या परिमाणा पेक्षा कमी पुरवठयाची भरपाई निविदा धारकांस त्याचवेळी करुन घ्यावी लागेल. तसे न केल्यास या विभागामार्फत स्थनिक बाजारातून त्यावेळी प्रचलीत असलेल्या भावाने बीफची/दतर मास प्रकाराची खरेदी केली जाईल आणि या खरेदी व वाहतुकीपोटी खर्च झालेली रक्कम निविदा धारकांस देयकामधून वसूल करण्यांत येईल.

६) काही कारणास्तव जर बीफ पुरवठा कमी/जास्त प्रमाणात लागणार असले, अथवा काही कालावधीसाठी नको असेल तर त्याबाबत मक्तेदारास एक दिवस अगोदर सुचित करण्यात येईल व त्यानुसारच बीफचा पुरवठा स्विकारला जाईल.

७) पुरविण्यांत येणाऱ्या बीफमध्ये किंवा अन्य खाद्य पदार्थात जर सर्व किंवा थोडेही बीफ खराब अगर भेसळयुक्त असल्याने पशुवैद्यकिय अधिकारी यांचे निदर्शनास आल्यास पुरवठा केलेले संपूर्ण बीफ अस्विकृबत करणेत येईल आणि अशा परिस्थितीत दुसऱ्या ताज्या बीफचा तात्काळ पुरवठा करावा लागेल आणि तसा पुरवठा न केल्यास आवश्यक तेवढे बीफ स्थानिक बाजारांतून खरेदी केले जाईल. बाजारात आवश्यक तेवढे बीफ उपलब्ध न झाल्यास प्राण्यांना खाण्यांस योग्य असलेल्या इतर प्राणी /अथवा ब्रायलरचे मांस बाहेरुन (स्थानिकरित्या) खरेदी करणेत येईल आणि तशा खरेदीपोटी (वाहतुकीसह) मंजुर दरापेक्षा जास्त झालेल्या खर्चाची रक्कम मक्तेदारांच्या त्या महिन्याच्या एकूण देय असलेल्या बीलांतून कापून घेतली जाईल.

८) पुरवठा करण्यांत येणारे बीफ प्राण्यांना खाण्यांस योग्य आहे किंवा नाही, याबाबत खात्री करण्यासाठी त्याचे नमुने पशु वैद्यकिय महाविद्यालय, परेल मुंबई येथील प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविले जातील व त्यासाठी येणारा खर्च मक्तेदारांचे बीलांतून कापून घेतला जाईल. असे नमुने निविदा धारकाचे अथवा त्यांचे प्रतिनिधीचे उपस्थितीत महिन्यातून दोनदा किंवा चारदा (परिस्थितीनुसार) घेण्यांत येतील.

९) पशु वैद्यकिय महाविद्यालय, परेल मुंबई येथील प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविणेत येणाऱ्या बीफच्या नमून्यापैकी जर एक किंवा एकापेक्षा अधिक नमुने प्राण्यांना खाण्यास अयोग्य असा अभिप्राय पशु वैद्यकिय महाविद्यालय, परेल, मुबंई यांचेकडून आल्यास त्या दिवशीच्या बीफ पुरवठयाची रक्कम त्यांचे बीलातून वसूल करणेत येईल आणि अशा अयोग्य पुरवठयाबाबत दंडात्मक कार्यवाही म्हणून मक्ता रद्दकरणेत येईल व निविदा धारकाचा बीफ पुरवठा बाबतचा परवाना रद्द करण्याबाबत संबंधित शासकीय यंत्रणेस शिफारस करण्यात येईल तसेच अनामत रक्कमही वेगळयाने शासन जमा करणेत येईल व पुरवठा धारकाचे निवेदन /खुलासा स्विकारला जाणार नाही.

१०) आठवडयांतून एक दिवस बहुधा दर गुरुवारी अगर ठरविलेल्या दिवशी बीफ पुरवठा घेतला जाणार नाही.

११) पुरवठा केलेल्या बीफची रक्कम शक्यतोवर महिन्यांतून एक वेळा धनादेशाद्वारे अदा केली जाईल. बीफ पुरवठयाची रक्कम रोख अथवा आगाऊ दिली जाणार नाही.

१२) निविदाधारकाकडून जर निकृष्ठ दर्जाचे बीफचा पुरवठा केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच काही वेळेस संबंधित कत्तलखाना येथे मरणासन्न अवस्थेतील खटाऱ्यावरिल प्राण्यांचे बीफ आणले जाते अशा प्रकारच्या प्राण्यांचे बीफ कोणत्याही परिस्थतीत स्विकारले जाणार नाहीत. निकृष्ठ दर्जाचे बीफ खाल्यामुळे प्राण्यांस कसल्याही प्रकारचा त्रास झाल्यास अथवा प्राणी मृत्युमुखी पडल्यास त्यासाठी निविदाधारक हयांस पूर्णपणे जबाबदार धरण्यात येईल व निविदा धारकाचा बीफ पुरवठा बाबतचा परवाना रद्द करण्याबाबत संबंधित शासकीय यंत्रणेस शिफारस करण्यात येईल आणि झालेल्या नुकसानीची भरपाई रक्कम निश्चित करण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना राहतील.

१३) नैसगिक आपत्ती किंवा डिझेल दरवाढ इत्यादी कारणांमुळे भावबंद नमुद केलेल्या दरांत कोणत्याही प्रकारे बदल करणेत येणार नाही.

१४) बीफ पुरवठा कोणत्याही परिस्थितीत नोंदविलेल्या मागणी प्रमाणे आणि ठरविलेल्या वेळेतच करण्याचा असून तो उत्तम प्रतिचा ताजा व ठरविलेल्या परिमाणातच करणेचा आहे.

१५) निविदा मंजूर झालेल्या निविदा धारकाकडून त्यांच्या बिलांतून **२.३४** टक्के किंवा शासकीय नियमाप्रमाणे नियमित आयकर वसूल केला जाईल. निविदासोबत मागील **१** वर्षाचे आयकर विवरण पत्र सादर करावे.

१६) निविदा धारकाकडून उपरोक्त कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कार्यवाही करण्यापूर्वी मत्तेकेदारांस त्यासंदर्भात त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाईल व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नंतरच त्यांचे विरुध्द मक्ते रद्दकरणे अगर दंडाची रक्कम आकारणेबाबत जरुर ती कार्यवाही केली जाईल.

१७) वरीलपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत जर निविदा धारकाकडून मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी दंड केल्यास किंवा निविदा रद्द केला असल्याबद्दलचे आदेश निविदा धारकांस दिल्यास निविदा धारकांस असे आदेश मिळाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम,मुंबई यांचेकडे अपिल दाखल करता येईल. यावर अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई. यांनी दिलेले आदेश अंतिम असतील.

१८) प्राण्यांनी खाऊन शिल्लक राहीलेले मांस, हाडे वगैरे जागेवरुन गोळा करुन दुसऱ्या दिवशी त्याची विल्हेवाट लावणेकामी त्यांचे खर्चाने उलचून न नेल्यास त्यांनी पुरवठा केलेले ताजे बीफ स्वीकारले जाणार नाही.

१९) करारनामा झाल्यानतंर निविदा धारक पूर्वसूचना न देता निविदा मध्येच सोडून गेल्यास कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल व त्यांचे सर्व अंतिम अधिकार मुख्य वनसंरक्षक व सचांलक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना असतील.

२०) बीफ पुरवठा करण्यात येणारे वाहन हे स्वच्छ /हवेशीर व तळाला ॲल्युमिनीयम पत्रा असलेले असावे बीफ हे झाकलेले असावे. तसेच दररोज वाहनाचे निर्जंतुकीकरण केले नंतरच बीफ पुरवठा करण्यात यावा.

२१) सदर कराराची मुदत संपल्यानंतर पुढील दर निश्चित होऊन नविन कबुलायत होईपर्यंत मध्यंतरीच्या काळात वरील दरानेच खाद्य पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

मुख्य वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

ठिकाण : बोरीवली

# <u>महाराष्ट्र शासन</u>

## वन विभाग

### मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६.

Tel. 28860362/389E-mail : sgnpmumbai@gmail.

## ई- निविदापत्रक

**मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, मुंबई** यांचकडे मी /आम्ही निविदा श्री...............................................................मुक्का......................पोस्ट..................... पीन कोड क्रमांक ....................तालुका..........................जिल्हा...................यांजकडून निविदा देणेत येते की, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील उद्यानातील वन्यप्राण्यांसाठी **दिनांक ०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८** या कालावधीसाठी ताजे म्हशीचे बीफ पुरवठा करणेबाबत अधिकृत पशुखाद्य पुरवठा परवानाधारकांकडून मोहारबंद निविदा सूचना प्रसिध्द झालेल्या जाहीर नाम्यानुसार खालीलप्रमाणे देत आहे./आहोत.

| **बीफ पुरवठा कालावधी** | **प्रतिदिन अंदाजे लागणारे बीफ परिमाण किलो.** | **बीफ (म्हशीचे) प्रति किलो दर रुपये** | **शेरा** |
|---|---|---|---|
| **०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८** | **प्रतिदिन १५० किलो** | रुपये अंकी<br><br>रुपये अक्षरी | |

मी /आम्ही उपरोक्त दिलेल्या निविदाचे खरेपणाबद्दल रक्कम **रुपये १,२०,०००/-** दिनांक ......................चा धनाकर्ष (डिमांउ ड्राप्ट) **RTGS/NEFT/NET BANKING** .......................क्रमांक .................हा ................................बँकेच्या सोबत जोडला आहे.

सदर निविदा माझे /आमचे नांवे मंजूर झाल्यास आपल्या ज्या अटी /शर्ती असतील त्या बंधनकारक राहतील. तसेच वेळोवेळी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणेस बांधील आहे / आहोत.

सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडली आहेत.

१)

२)

३)

४)

बोरीवली. ( निविदा देणाऱ्याची सही )

दिनांक :- / /२०१७

# <u>महाराष्ट्र शासन</u>

## वन विभाग

### मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६.

## <u>ई- निविदासूचना</u>

**<u>संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व),मुंबई - ४०००६६.</u>**येथील उद्यानांतील वन्यप्राण्यांसाठी १५० किलो प्रति दिवस (गुरुवार सोडून) म्हशीचेताजे बीफ **<u>दिनांक १/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८</u>** कालावधीसाठी पुरवठा करणेबाबत अधिकृत खाद्य पुरवठा परवाना धारकांकडून **ई-निविदा** मुख्य वनसंरक्षक, **संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व)** यांचे नावाने मागविण्यात येत आहेत.

**१)** सदर निविदा सूचना व निविदा प्रपत्र WWW.mahatenders.gov.in **या** संकेत स्थळावर **दि.१५/०५/२०१७ ते २७/०५/२०१७** पर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ऑन लाईन भरण्याची अंतिम **दि. २७/०५/२०१७** रोजी **दुपारी १४.००** वाजेपर्यंत आहे.

**२)** ई-निविदा प्रपत्राची **किमंत रु. १२०००/-** इसारा **रक्कम रु. १,२०,०००/-रा**हिल.

**३)** निविदाकाराने त्यांच्या निविदा दि. **१५/०५/२०१७ ते २७/०५/२०१७ पर्यंत दुपारी २.००** वाजेपर्यंत ई-टेंडरीग पध्दतीने सादर कराव्यात. सदर निविदा **दि. २९/०५/२०१७** रोजी **सकाळी ११.०० वाजता** उघडण्यात येतील.

**४)** निविदा बाबतच्या सविस्तर अटी व शर्ती निविदा प्रपत्रात सोबत नमुद करण्यात आलेल्या आहेत.

**५)** कोणतीही निविदा कोणत्याही कारणास्तव मजुंर करणे अथवा नामंजूर करणेचा अधिकार **मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, मुंबई** यांनी राखून ठेवलेला आहे.

*सही.*
मुख्य वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली

ठिकाण : बोरीवली.
दिनांक :